**प्रेस नोट 29.05.2019**

**साडेचार वर्षे, दीड किलोमीटर, एक तास, शोध सफल, धन्यवाद पुणे पोलीस!**

लहान मुलांकडे कितीही लक्ष ठेवले, तरी त्यांच्या डोक्यात काय विचार चालले असतील आणि कोणत्या क्षणी ते काय करतील याचा काही भरवसा नसतो. नऱ्हे येथे राहाणाऱ्या सुहानी माळीला आपल्या बाबांचा विशेष लळा होता. ते परगावी गेले होते. आपल्याला बाबांकडे जायचं आहे हा विचार सुहानीच्या डोक्यात होता.

आई बाथरूममध्ये आहे हे पाहून, खेळता खेळता अचानक, परगावी गेलेल्या पप्पांकडे जाते म्हणून साडेचार वर्षांची सुहानी घरातून बाहेर पडली. संध्याकाळी साडेसात वाजता वाहात्या सिंहगड रस्त्यावर आपली चिमुरडी हरवली आहे हे लगेचच तिच्या आईच्या लक्षात आले. लगेच घराजवळ तिची शोधाशोध सुरू झाली. जवळपासही ती कुठे दिसत नाही असे पाहिल्यावर पालकांनी पोलिसांकडे धाव घेतली. सिंहगड पोलीस स्टेशन अंकित नऱ्हे पोलीस चौकीत पोलीस हवालदार मते यांना ही हकीगत सांगताच त्यांनी तातडीने तिचा फोटो व्हॉटस्अॅप ग्रुपवर टाकून सर्व मार्शलना सूचना दिल्या. त्यानुसार नऱ्हे मार्शलचे पोलीस कर्मचारी सुशांत यादव आणि पोलीस शिपाई महेंद्र राऊत यांनी आपल्या हद्दीत तिचा शोध सुरू केला.

दरम्यान ही छोटीशी मुलगी एकटीच रस्त्याने जाताना पाहून भुमकर पुलाजवळ एका सद्गृहस्थाने तिला हटकले आणि ती हरवली आहे, घरापासून पुष्कळ लांब आली आहे असे त्यांच्या लक्षात आले. तिला शोधत कुणीतरी येईल म्हणून ते तिला घेऊन तिथेच थांबले. मुलीला पत्ता अजिबात सांगता येत नव्हता.

शोध घेत असलेले पोलीस कर्मचारी आणि हे गृहस्थ एकदमच एकमेकांना दिसले. पोलीस दिसल्यावर त्यांनाही हायसे वाटले आणि त्यांनी या हरवलेल्या मुलीला पोलिसांच्या ताब्यात दिले. पोलिसांच्या हातातला फोटो एका नटलेल्या, सजलेल्या बर्थडे गर्लचा होता, त्यामुळे फोटोत आणि समोरच्या मुलीत बऱ्यापैकी तफावत होती.

तरीही दोघे पोलीस कर्मचारी मुलीला घेऊन नऱ्हे चौकीत आले. तिथे तिच्या आईवडिलांनी लगेचच तिला ओळखले व हीच आपली मुलगी असल्याची पोलिसांचीही खात्री पटवून दिली. पोलिसांनी त्वरित हालचाल केल्यामुळे घरापासून दीड किलोमीटर दूर आलेली ही लहानगी केवळ एका तासात सापडली. सुहानी माळीचे पालक व नातेवाईक यांनी पोलिसांचे मनःपूर्वक आभार मानले.